# महाराष्ट्र विधानसभा

## दिवसाच्या कामकाजाचा क्रम
## शुक्रवार, दिनांक १ एप्रिल, २०१६
## (सकाळी १०.०० वाजता)

**एक : प्रश्नोत्तरे.**

**दोन : कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवणे -**

**महिला व बाल विकास मंत्री :** (क) महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाचा सन २००८-२००९ ते २०१२-२०१३ या वर्षांचे स्वतंत्र लेखापरीक्षा अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

(ख) महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाचा सन २०१३-२०१४ या वर्षाचा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**तीन : स्थगन प्रस्तावाच्या सूचना – (असल्यास) (म.वि.स. नियम ९७ अन्वये).**

**चार : औचित्याचे मुद्दे.**

**पाच : लक्षवेधी सूचना (म.वि.स. नियम १०५ अन्वये) :**

**(मंगळवार, दिनांक २९ मार्च, २०१६ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली परंतु पुढे ढकलण्यात आलेली लक्षवेधी सूचना क्र. १)**

**(१) सर्वश्री अमीत साटम, संजय पोतनीस, विजय वडेट्टीवार, अस्लम शेख, त्र्यंबकराव भिसे, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे शालेय शिक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"मुंबई उपनगरातील मालाड पश्चिम येथील श्री ट्युटोरीयल्स या खाजगी क्लासेसच्या शिक्षिकेने दोन विद्यार्थ्यांना कपडे काढून बाहेर रस्त्यावर उभे केले असल्याचे दिनांक १२ मार्च, २०१६ रोजी निदर्शनास आले असणे, तसेच सायन येथील शाळेमध्ये इयत्ता ४थी व ५वी च्या ४ विद्यार्थीनींवर त्यांच्या शिक्षकाने लैंगिक अत्याचार केलेले निष्पन्न झाले असणे, याबाबत पालकांनी सदर शाळेच्या मुख्याध्यापकाकडे तक्रार केली असता त्या कडे त्यांनी केलेले दुर्लक्ष, पोलिसांनी याबाबत सदर शिक्षकाविरुद्ध गुन्हा नोंदविला असणे, माहे जानेवारी, २०१६ मध्ये दादर येथील शाळेच्या आवारामध्ये एका क्लिनरने ९ वर्षांच्या विद्यार्थीनींवर लैंगिक अत्याचार केला असणे, तसेच माहे फेब्रुवारी, २०१६ मध्ये अंधेरी येथील राजहंस विद्यालयामध्ये इयत्ता पहिलीमध्ये

शिकणाऱ्या ६ वर्षाच्या मुलीवर एका खाजगी वाहनचालकाने केलेला बलात्कार, याबाबतीत सदर वाहनचालकाला केलेली अटक, सदर मुलीने झालेल्या बलात्काराबद्दल शाळेतील शिक्षिकेला सांगितले असता त्यांनी केलेले दुर्लक्ष, सदर प्रकार शाळेतील आवारामध्ये घडल्यामुळे शाळेतील सुरक्षाव्यवस्था तसेच शाळेच्या आवारामध्ये सी.सी.टी.व्ही. कॅमेरे नसल्याचे उघडकीस येणे, खाजगी गाडीचा वाहनचालक शाळेच्या आवारामध्ये घुसून शाळेतील विद्यार्थीनीवर बलात्कार करणे, यावरुन सदर शाळेची सुरक्षाव्यवस्था ढिसाळ असल्याचे निष्पन्न होणे, शाळा व खाजगी क्लासेसमध्ये विद्यार्थ्यां च्या सुरक्षा व्यवस्थे बाबत कायद्या मध्ये तरतूदींचा अभाव असणे, उक्त प्रकरणी सखोल चौकशी करून संबंधितांवर कारवाई करण्याची होत असलेली मागणी तसेच या संदर्भात राज्यातील सर्व शाळा व खाजगी क्लासेसमधील विद्यार्थी व विद्यार्थीनी यांच्या सुरक्षा व्यवस्थेच्या बाबतीत धोरणा त्मक निर्णय घेण्याबाबत राज्य शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व याबाबत शासनाची प्रतिक्रिया."

**(२) श्री.डी.एस.अहिरे, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आदिवासी विकास मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"सन १९८५ मध्ये लागू झालेल्या पेसा कायद्याअंतर्गत येणाऱ्या ग्रामपंचायती तसेच महसूल गावाचे कालांतराने विभाजन होऊन त्या मूळ ग्रामपंचायत किंवा महसूल गावापासून स्वतंत्र महसूल गाव किंवा स्वतंत्र ग्रामपंचायत निर्माण झालेल्या गावांचा पेसा कायद्यामध्ये समावेश असल्याबाबत सुधारित यादी शासनाने प्रसिध्द न केल्याने त्या गावांना शासनामार्फत मिळणाऱ्या ५% निधीचा लाभ न मिळणे, धुळे जिल्ह्यातील साक्री तालुक्यातील दहिवेल मुळ ग्रामपंचायत पैकी खरडबारी, मालणगाव, रोहण मूळ ग्रामपंचायत पैकी झंझाळे तसेच चोरवड या मूळ ग्रामपंचायत पैकी पिंपळगाव (खु.) इत्यादी २७ ग्रामपंचायत याच कारणांमुळे या योजनेपासून वंचित राहणे, परिणामी संबंधित गावांच्या नागरिकांमध्ये पसरलेला असंतोष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

**सहा : सन २०१६-२०१७ च्या अर्थसंकल्पातील अनुदानाच्या मागण्यांवर चर्चा व मतदान (पाचवा दिवस).**

(१) सामान्य प्रशासन विभाग.

(२) गृह विभाग.

(३) नगरविकास विभाग.

(४) विधी व न्याय विभाग.

(५) गृहनिर्माण विभाग.

**(मतास टाकावयाच्या मागण्यांची सूची स्वतंत्रपणे वितरीत केल्याप्रमाणे)**

**सात : शासकीय विधेयके :**

**विचार, खंडश: विचार व संमत करणे :-**

**(१)** (क) भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३ (२) ( अ) आणि महाराष्ट्र वि धानसभा नियम १५९ (२) अन्वये सर्वश्री अमीन पटेल, जितेंद्र आव्हाड, हनुमंत डोळस, राधाकृष्ण विखे पाटील, बाळासाहेब पाटील, राणाजगजितसिंह पाटील, शशिकांत शिंदे, अजित पवार, अबु आझमी, जयंत पाटील, छगन भुजबळ, भास्कर जाधव, विजय वडेट्टीवार, जयदत्त क्षीरसागर, दिलीप वळसे-पाटील, श्रीमती दिपिका चव्हाण, श्री.सुरेश लाड, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-

"ही विधानसभा सन २०१६ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ५ – महाराष्ट्र सहकारी संस्था (दुसरी सुधारणा) अध्यादेश, २०१६ नापसंत करते."

(ख) **सन २०१६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ७ - महाराष्ट्र सहकारी संस्था (दुसरी सुधारणा) विधेयक, २०१६.**

---

(२) (क) **सन २०१६ चे विधानसभा विधेयक क्रमांक २ – कंत्राटी कामगार सेवा (विनियमन व उच्चाटन) (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०१६.**

(ख) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री विजय वडेट्टीवार, अस्लम शेख, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१६ चे महाराष्ट्र विधानसभा विधेयक क्रमांक २ – कंत्राटी कामगार सेवा (विनियमन व उच्चाटन) (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०१६ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४० सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ग) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री भास्कर जाधव , राणाजगजितसिंह पाटील, हनुमंत डोळस, जितेंद्र आव्हाड, शशिकांत शिंदे, अजित पवार, जयदत्त क्षीरसागर , सुरेश लाड , श्रीमती ज्योती कलानी , सर्वश्री छगन भुजबळ, दिलीप वळसे-पाटील, जयंत पाटील, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१६ चे महाराष्ट्र विधानसभा विधेयक क्रमांक २ – कंत्राटी कामगार सेवा (विनियमन व उच्चाटन) (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०१६ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३२ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(गुरुवार, दिनांक ३१ मार्च, २०१६ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव)**

आठ : **सर्वश्री राधाकृष्ण विखे पाटील, अजित पवार, पृथ्वीराज चव्हाण, जयंत पाटील, डॉ. पतंगराव कदम, सर्वश्री दिलीप वळसे-पाटील, गणपतराव देशमुख, बाळासाहेब थोरात, भास्कर जाधव, मो. आरिफ नसीम खान, जितेंद्र आव्हाड, गोपालदास अग्रवाल, जयदत्त क्षीरसागर, विजय वडेट्टीवार, हनुमंत डोळस, नितेश राणे, पांडुरंग बरोरा, अब्दुल सत्तार, डॉ. सतीश पाटील, प्रा. विरेंद्र जगताप, सर्वश्री नरहरी झिरवाळ, सुनिल केदार, दिपक चव्हाण, सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील, ॲड. यशोमती ठाकूर, सर्वश्री अस्लम शेख , वसंतराव चव्हाण, डी.पी.सावंत, कालीदास कोळंबकर, मधुकरराव चव्हाण, काशीराम पावरा, अमिन पटेल, प्रा. वर्षा गायकवाड, सर्वश्री जयकुमार गोरे , राहुल बोंद्रे, अमित झनक, अमर काळे, ॲड. के. सी. पाडवी, सर्वश्री डी. एस. अहिरे, हर्षवर्धन सपकाळ, रणजित कांबळे, श्रीमती अमिता चव्हाण , डॉ. संतोष टारफे, सर्वश्री कुणाल पाटील , शेख आसिफ शेख रशिद, श्रीमती निर्मला गावित, सर्वश्री संग्राम थोपटे, भाऊसाहेब कांबळे, ॲड. त्र्यंबक भिसे, सर्वश्री अमित देशमुख, बसवराज पाटील, कु. प्रणिती शिंदे, सर्वश्री सिध्दाराम म्हेत्रे, भारत भालके, वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव (चर्चा पुढे सुरु व मंत्र्यांचे उत्तर) :**

"मुंबई महानगरपालिकेच्या गैरकारभाराची व भ्रष्टाचाराची अनेक प्रकरणे उघडकीस येऊनही शासनाने त्याची दखल न घेणे , मुंबईतील मैदानांचा लिलाव , गृहनिर्माण धोरणाच्या अनिश्चिततेमुळे म्हाडाच्या ३०० इमारतींचा रखडलेला पुनर्विकास , म्हाडाच्या संक्रमण शिबीरातील घुसखोरी , SRA चे रखडलेले प्रस्ताव, गिरणी कामगारांच्या घरांच्या प्रश्नाकडे झालेले दुर्लक्ष, मुंबई महापालिका क्षेत्रात डम्पिंग ग्राऊंडचा यक्ष प्रश्न, मुंबई मेट्रो व विकास आराखड्यातील घोटाळा, वाहनतळाची निर्माण झालेली समस्या व होणारी वाहतुकीची कोंडी, बीडीडी चाळीच्या पुनर्विकासाबाबत निर्णय न होणे , अनधिकृत बांधकामांना मिळणारे संरक्षण, उपकरप्राप्त इमारतींचा पुनर्विकास होणे , उर्वरित मोडकळीस इमारतींचा पुनर्विकास करण्याकडे शासनाचे झालेले दुर्लक्ष , कोस्टल रोडला स्थानिक रहिवाशी व कोळीवाड्यांचा असलेला विरोध, कोकणाच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने शासनाचे होत असलेले दुर्लक्ष , फळ प्रक्रिया उद्योगास चालना देणे, राज्यातील ४८ लहान मोठी बंदरे कोकणात असताना , त्यांच्या विकास व देखभालीकडे होत असलेले दुर्लक्ष, कोकणातील पर्यटनस्थळांचा विकास करुन ठोक पॅकेज देण्याची आवश्यकता , मुंबई उपनगर जिल्ह्यासह सातही जिल्ह्यातील समुद्रकिनारी असलेली शहरे व गावांना सीआरझेडचा बसलेला फटका, परिणामी शहरे व गावांचा खुंटलेला विकास, सी-वर्ल्ड प्रकल्पाचे कामास अद्यापही सुरुवात न होणे, कोकणात ७२० कि.मी.चा समुद्रकिनारा असूनही अद्यापही मेरीटाईम ट्रेनिंग इन्स्टिट्युट आणि फिशरिज विद्यापीठ नसणे, कोकणात येऊ घातलेले १८ ते १९ औष्णिक प्रकल्प , परिणामी धोक्यात येणारे पर्यावरण, त्यामुळे मासे मृत होण्याचे वाढते प्रमाण , परिणामी लोकांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष , याकरिता पेंडसे-केंद्रेकर अहवालाच्या शिफारशींची अंमलबजावणी करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही विचारात घेण्यात यावी."

## अशासकीय कामकाज

## (बैठकीच्या अखेरचे २ १/२ तास)

नऊ : **अशासकीय विधेयके :-**

**(अ) पुर:स्थापनार्थ :**

(१) सन २०१६ चे वि.स.वि. क्रमांक ५ - महाराष्ट्र दारुबंदी (सुधारणा) विधेयक, २०१६ – **श्री. सुनिल शिंदे, वि.स.स. यांचे.**

(२) सन २०१६ चे वि.स.वि. क्रमांक ११ - मुंबई महानगरपालिका (सुधारणा) विधेयक, २०१६ – **ॲड. पराग अळवणी, वि.स.स. यांचे.**

(३) सन २०१६ चे वि.स.वि. क्रमांक १२ - महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) विधेयक, २०१६ – **श्री. सुनिल प्रभु, वि.स.स. यांचे.**

**(ब) विचारार्थ :**

(१) सन २०१५ चे वि.स.वि. क्रमांक ४५ – महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) विधेयक, २०१५ – **श्री. सुरेश हाळवणकर, वि.स.स. यांचे.**

(२) सन २०१५ चे वि.स.वि. क्रमांक ६९ - महाराष्ट्र लोक आयुक्त आणि उप लोक आयुक्त (सुधारणा) विधेयक, २०१५ – **श्री. अतुल भातखळकर, वि.स.स. यांचे.**

(३) सन २०१५ चे वि.स.वि. क्रमांक ६७ - मुंबई महानगरपालिका (दुसरी सुधारणा) विधेयक, २०१५ – **ॲड. आशिष शेलार, वि.स.स. यांचे.**

(४) सन २०१५ चे वि.स.वि. क्रमांक २५ - महाराष्ट्र दुकाने व आस्थापना (सुधारणा) विधेयक, २०१५ – **श्री. अमीन पटेल, वि.स.स. यांचे.**

**विधान भवन,**
मुंबई,
दिनांक : ३१ मार्च, २०१६

**डॉ. अनंत कळसे,**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानसभा.